मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षते खाली दि.०७/०१/२०१७ रोजी मानीव वनाचे सर्वेक्षण व अंमलबजावणीबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

---

हेमा रमाणी, **Bombay Environmental Action Group** यांचेकडील पत्र दिनांक ८/१०/२०१५ व २९/११/२०१६ च्या अनुषंगाने दिनांक ०७/०१/२०१७ रोजी मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११.०० वाजता मानीव वनाचे सर्वेक्षण व अंमलबजावणीबाबत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

१) श्री. एस.आर.शिंदे, अधिक्षक माथेरान
२) डॉ.सागर घोलप, मुख्याधिकारी, माथेरान,
३) श्रीम. उर्मिला गलांडे, उप अधिक्षक भूमी अभिलेख, कर्जत
४) श्री. मा. द. राठोड, सहाय्यक संचालक नगर रचना रायगड अलिबाग
५) श्री. एम.बी.चंदनशिवे, सहाय्यक वनसंरक्षक, पनवेल
६) श्री.ए.आर. लांडगे, वनक्षेत्रपाल माथेरान (अतिरिक्त)
७) श्रीम. हेमा रमाणी, बॉम्बे इनव्हॉमेंटल ॲक्शन ग्रुप

बैठकीच्या सुरुवातीला उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली. प्रथम माथेरान येथील भूखंडाबाबत आढावा घेण्यात आला त्यावेळी माथेरान मध्ये माथेरान प्लॉट n२५४ क्षेत्र २४३.४० हे.आर. आणि बाजार प्लॉट २५८ क्षेत्र ११.६० हे. आर. असे एकूण ५१२ भूखंडाचे एकूण क्षेत्र २५५.०१ हे.आर इतके आहे असे सांगण्यात आले. तसेच राखीव वनाचे क्षेत्र ३८०.३८, डिम फॉरेस्ट ३१.७१, रेल्वे १६.८१, रस्ते २३.७०,तलाव २.७८ याप्रमाणे माथेरानचे क्षेत्राबाबत माहिती देण्यात आली.

माथेरान प्लॉट व बाजार प्लॉट मिळून एकूण ५१२ प्लॉट आहेत.त्यापैकी १५५प्लॉट चा सर्व्हे झाला असल्याचे बैठकीमध्ये सांगण्यात आले.

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२०२/२०१५अंतर्गत **intrim Application** ६६९/२००१ मध्ये माथेरान गिरीस्थानावरील वन व इतर जमिनीवर असलेल्या वृक्ष आच्छादित क्षेत्राचे सर्वेक्षण करणेबाबत निर्देश दिलेले होते. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे मात्र त्यामध्ये काही त्रुटी असल्याचे मा.जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले. सर्व प्लॉटची मोजणी झालेली नसताना डीपी प्लॅन कसा तयार केला तसेच त्यावेळी कोणाच्या हरकती प्राप्त झाल्या होत्या का त्यावर सुनावणी घेण्यात आली होती का ? अशी मा.जिल्हाधिकारी यांनी विचारणा केली. त्याबाबत सहाय्यक संचालक नगर रचना रायगड यांनी असे सांगितले की,त्यावेळी १५५ प्लॉटची मोजणी करुन प्रारुप आराखडा प्रसिध्द करुन अंतिम मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे.

बॉम्बे ॲक्शन ग्रुपच्या श्रीम. हेमा रमाणी यांनी सर्वेक्षणाचे जे काम झालेले आहे ते अपूर्ण आहे असे म्हणणे मांडले. माथेरान गिरीस्थानकावरील सर्वेक्षणाचे कोणतेही नकाशे उपलब्ध झालेले नाहीत. तसेच ५१२ प्लॉटपैकी फक्त १५५ प्लॉटची मोजणी झालेली आहे त्यामध्येही काही त्रुटी असल्याचे त्यांनी सदर बैठकीमध्ये सांगितले.

उप वनसंरक्षक,अलिबाग यांचेकडील दि.१४/१/२०१५ रोजी आलेल्या पत्रामध्ये रिट याचिका क्र. २०२/१९९५ मध्ये झालेल्या दि.१२/१२/१९९६ चे निर्णयानुसार माथेरान गावाचा समावेश असल्याचा आढळ होत नाही माथेरान वन संदृश संज्ञेत येत नाही असे बैठकीत निदर्शनास आणून देण्यांत आले.

मा.जिल्हाधिकारी यांनी माथेरान गिरीस्थानकावरील सर्व प्लॉटची मोजणी प्रक्रिया पूर्ण झालेली आहे काय ? तसेच मोजणी करताना कोणत्या पध्दतीचा वापर केला त्याचे नकाशे तयार केले होते काय? याबाबत उप अधिक्षक भूमी अभिलेख, कर्जत यांना विचारणा केली. माथेरान येथील

प्लॉटचे सन २०१० मध्ये मोजणी झाली होती त्यामध्ये फक्त १५५ प्लॉटची मोजणी झालेली दिसून येत आहे. त्यांनतर पावसाळयाचे दिवस असल्याने मोजणीचे काम पूर्ण होऊ शकले नाही. तसेच ज्या ठिकाणी कमी झाडे आहेत तेथील मोजणीचे काम १००% पूर्ण झालेले आहे. त्याचे नकाशे उप वनसंरक्षक यांना पाठविण्यात आलेले होते. असे उप अधिक्षक भूमी अभिलेख, कर्जत, यांनी सांगितले.

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिकाक्र.२०२/२०१५अंतर्गत **intrim Application** ६६९/२००१ मध्ये माथेरान गिरीस्थानावरील वन व इतर जमिनीवर असलेल्या वृक्ष आच्छादित क्षेत्राचे सर्वेक्षण करणेबाबत निर्देश दिलेले होते. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे त्यामध्ये काही त्रुटी असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. त्यामध्ये माथेरान मधील ५१२ भूखंडापैकी १५५ भूखंडाची मोजणी झालेली आहे असे दिसून आले. उर्वरित सर्व भूखंडाची मोजणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार होणे आवश्यक आहे त्यामुळे उप अधिक्षक भूमी अभिलेख, कर्जत आणि वन संरक्षक अलिबाग यांनी आवश्यक मनुष्यबळ, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन माथेरान गिरीस्थानकावरील उर्वरित भूखंडाची मोजणी ईटीएस मशीनचा वापर करुन करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मोजणी नकाशासह या कार्यालयास सादर करणेबाबतचे निर्देश सदर बैठकीत देण्यात आले.

वरीलप्रमाणे बैठकीत कामकाज होऊन उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहिर करण्यात आले.

सही/-xxx
(शीतल तेली-उगले)
जिल्हाधिकारी रायगड

क्र.मशा/जमीन/अ-२/मानीव वन सर्वेक्षण/२०१७
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
अलिबाग, दिनांक २० /०२/२०१७

प्रत :-

१. उप वन संरक्षक अलिबाग
२. अधिक्षक माथेरान
३. मुख्याधिकारी माथेरान नगर परिषद माथेरान
४. उप अधिक्षक भूमी अभिलेख कर्जत
५. सहाय्यक संचालक नगर रचना रायगड अलिबाग
६. वनक्षेत्रपाल माथेरान

२/- यांना माहीतीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

७. श्रीम. हेमा रमाणी, बॉम्बे इनव्हॉर्मेंटल ॲक्शन ग्रुप मुंबई यांना माहीतीसाठी.
६० एम्पायर बिल्डिंग, दुसरा मजला, १३४/१३६
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४०० ००१.

जिल्हाधिकारी रायगड करीता.

